लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## २९ व ३० एप्रिल रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी २९ आणि ३० एप्रिल २०२६ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत २९ एप्रिल रोजी देवणी येथील कै. रसिका महाविद्यालय आणि ३० एप्रिल रोजी जळकोट येथील महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय येथे सकाळी १० वाजता मुलाखती पार पडणार आहेत.

या मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित टोयोटा किर्लोस्कर मोटार प्रा. लि. ही कंपनी सहभागी होणार असून, त्यांच्या 'टोयोटा कौशल्या' उपक्रमांतर्गत 'शिका आणि कमवा' या तत्त्वावर उमेदवारांची निवड केली जाणार आहे. या संधीसाठी १८ ते २१ वयोगटातील दहावी किंवा बारावी उत्तीर्ण, तसेच पदवी शिक्षण घेत असलेले किंवा पदवीधर उमेदवार पात्र असतील. इच्छुक उमेदवारांनी शैक्षणिक कागदपत्रे, स्वतः चा रिझ्युम आणि पासपोर्ट फोटो यांच्या तीन प्रतींसह स्वखर्चाने संबंधित ठिकाणी उपस्थित राहावे. या सुवर्णसंधीचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त तरुणांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे सहायक आयुक्त नि. ना. सूर्यवंशी यांनी केले असून अधिक माहितीसाठी दत्तात्रय कांबळे (भ्रमणध्वनी क्र. ९०२८२३८४६५) किंवा लहू भंडारे (भ्रमणध्वनी क्र. ८०५५९९२९००) यांच्याशी संपर्क साधावा.



## विविध वृत्त...

### वाढत्या तापमानात आरोग्याची काळजी घ्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** सध्या वातावरणातील बदलांमुळे तापमान सतत वाढत असून हवामान खात्याच्या अंदाजानुसार मार्च महिन्यापासूनच राज्याच्या अनेक भागांत कडक ऊन जाणवू लागले आहे. साधारण एप्रिल आणि मे महिन्यांत सन बर्न, हिट कॅम्प्स (स्नायूंना गोळे येणे), हिट एक्झॉर्शन (प्रचंड थकवा) आणि हिट स्ट्रोक (उष्माघात) यांसारख्या उष्णताविकारांचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

उन्हात कष्टाची कामे करणारे मजूर, वृद्ध, लहान मुले, गरोदर महिला, स्थूल व्यक्ती, पुरेशी झोप न झालेले लोक तसेच मधुमेह, हृदयविकार आणि व्यसन असणाऱ्या व्यक्तींना उष्माघाताचा अधिक धोका असतो. याशिवाय घट्ट कपडे बॉयलरजवळ काम करणाऱ्या कामगारांनीही उष्णतेच्या लाटेत विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. उष्णतेमुळे होणाऱ्या त्रासाची लक्षणे सौम्य किंवा गंभीर स्वरूपाची असू शकतात. सौम्य त्रासात थकवा, ताप, शरीरावर पुरळ उमटणे, घालणारे नागरिक आणि कारखान्यात चक्कर येणे आणि हाता-पायांना गोळे येणे अशी लक्षणे दिसतात. मात्र, गंभीर स्थितीत त्वचा गरम व कोरडी पडणे, तीव्र डोकेदुखी, रक्तदाब वाढणे, नाडीचे ठोके वेगात पडणे, मानसिक अस्वस्थता आणि बेशुद्धावस्था येऊन मृत्यू ओढवण्याची भीती असते.

### लातुरात दोघांना जीवे मारण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** किरकोळ कारणावरून भावासोबत सुरू असलेले भांडण सोडविण्यास गेलेल्या फिर्यादीला व त्याच्या भावाला कात्री पोटात खुपसून, बरगडीवर मारून गंभीर जखमी केल्याची घटना शहराच्या इस्लामपुरा भागातील एका पानटरीवर शुक्रवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास घडली.

याप्रकरणी चार आरोपींविरोधात खुनाचा केल्याचा दाखल आला आहे. गुन्हा करण्यात

आरोपी रेहान मक्कासाब शेख व फिर्यादी शाहीद दस्तगीर शेख यांचा भाऊ शादब यांचा किरकोळ कारणावरून वाद सुरू होता. ते भांडण सोडविण्यास फिर्यादी शाहीद शेख गेले. त्यावेळी चिडलेल्या आरोपी रेहान मक्कासाब शेख याने फिर्यादीच्या डाव्या बरगडीवर व डाव्या दंडावर कात्रीने भोसकण्याचा प्रयत्न

केला. त्याचप्रमाणे शादब शेख याला जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याच आरोपीने पोटात कात्रीने भोसकून गंभीर जखमी केले. अन्य आरोपी जावेद शेख, रहेमतुल्ला मक्कासाब शेख व मक्कासाब शेख यांनी फिर्यादी व त्याचा गंभीर जखमी झालेला भाऊ शादब यांना लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले. यातील जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याप्रकरणी शाहीद मक्कासाब शेख यांच्या फिर्यादीवरून चार आरोपींविरोधात गुरनं. २७८/२६ कलम १०९ (१), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१ (२), (३), ३ (५) भारतीय न्यायसंहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक वसंत मुळे हे करीत आहेत.

### मल्हार फाऊंडेशनतर्फे डॉ. यशपाल भिंगे यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे व काँग्रेस ओबीसी लातूर जिल्हा अध्यक्ष प्राचार्य एकनाथ पाटील, काँग्रेस ओबीसी लातूर जिल्हा उपाध्यक्ष रघुनाथ मदने यांचा मल्हार फाउंडेशन लातूर यांच्या वतीने होळकर शाहीचे व माळवा प्रांताचे मराठी साम्राज्याचे विस्तारक संस्थापक सुभेदार मल्हारराव होळकर, प्रजाहितदक्ष महाराणी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर, महायोद्धा महापराक्रमी महाराजा यशवंतराव होळकर यांची संयुक्त प्रतिमा देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

## देशी मद्याची तऱ्हाच न्यारी, तळपत्या उन्हात पडलाय तरुण भारी !

**तभा वृत्तसेवा / श्रीधर स्वामी**



**लातूर, दि. २७ एप्रिल :** कोणत्याही व्यसनाने एकदा का मर्यादा ओलांडली की संबंधित मनुष्य चहूबाजूंनी जणू आयुष्यातून उठतो. सध्या लातुरात तापमानाने चाळीशी केव्हाच ओलांडली आहे. उन्हाच्या तिव्रतेमुळे नागरिकांना कामासाठीही घराबाहेर पडणे अवघड झाले आहे. अशा वेळी लातूरच्या मध्यवर्ती बस स्थानकाशेजारी एक तरुण ' देशी प्रेमी ' तरुण तळपत्या उन्हात शुद्ध गमावलेल्या अवस्थेत पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. ते दृश्य पाहून अनेकांना 'देशी मद्याची तऱ्हाच न्यारी, तळपत्या उन्हात पडलाय तरुण भारी !' अशी फक्कड कल्पना सुचल्यास नवल वाटू नये.

व्यसन करणाऱ्या व्यक्तींना कितीही व्यसनमुक्ती केंद्रात ठेवले, मानसोपचार तज्ज्ञांकडून इलाज करून घेतले तरी ती मंडळी आपला हेका सोडायला तयार नसतात, याचा अनुभव कित्येकांनी घेतला आहे. व्यसनापासून एखाद्याला परावृत्त करण्यासाठी देव देवत्यांना साकडे घालणे, एखाद्या मांत्रिकाला दाखविणे , प्रियजनांच्या शपथा घालणे असे एक ना अनेक प्रकार केले जात असल्याचे पाहायला मिळते. व्यसनमुक्ती केंद्रात नेवून ठेवले तरी बरीच मंडळी तेथून बाहेर पडल्यानंतर पुन्हा ' पहिले पाढे पंचावन्न' करताना दिसतात. मुळात कोणतेही व्यसन सोडण्यासाठी व्यसनी व्यक्तीच्या मनाने अगोदर तयारी ठेवणे आवश्यक असते. एखाद्याला व्यसन करू नये म्हणून कितीही पोटतिडकीने सांगितले तरी तो सांगणाऱ्याचे अत्यंत शांतपणे ऐकून घेतो आणि काहीही ऐकलं नसल्याच्या अविर्भावात पुन्हा ' गुत्त्याकडे ' वळतो. अशा व्यक्तींना घर - परिवार - समाज कशाचेही देणे - घेणे नसते. जणू ते आपल्या मस्तीत जगण्यालाच खरे जीवन समजून चालत असावेत, अशी शंका येते.

आजघडीला व्यसन हे केवळ मद्याचेच नाही तर अनेक प्रकारच्या नशेच्या औषधांचेही केले जात असल्याचे पाहायला मिळते. यामध्ये दुर्दैवाने उद्याची भावी पिढी मोठ्या संख्येने गुरफटताना पाहायला मिळते. महाविद्यालयीन युवक प्राधान्याने याला बळी पडत असल्याचे बोलले जाते. लातूरच्या ट्युशन एरिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरात सर्व प्रकारचे मादक पदार्थ विद्यार्थ्यांना त्याच भागात उपलब्ध करून देणारी टोळीही सक्रिय असल्याचे सान्गण्यात येते. हा प्रकार अतिशय घातक आणि गंभीर नव्हे काय ? ही बाब अल्लड असणाऱ्या विद्यार्थ्यांना आजमितीस गंभीर वाटत नसली तरी पालकांना आपल्या मुलांच्या भवितव्याबद्दल आतापासूनच चिंता वाटत असल्याचे दिसून येते.

सध्या उन्हाच्या तीव्रतेने मनुष्यासह सर्वच प्राणी मात्रांचे प्राण कासावीस होत आहेत. वाढत्या उष्म्यामुळे घराबाहेर पडणेही कठीण असताना सोमवारी दुपारी साधारण एक वाजण्याच्या सुमारास शहरातील मुख्य बस स्थानकाशेजारी असलेल्या रायगड हॉटेलच्या बाजूला , महावितरणच्या डीपी जवळेक तरुण मद्यधुंद अवस्थेत पडल्याचे दृश्य पाहायला मिळाले. त्या तरुणाच्या शेजारी आसपासच्या लोकांनी टाकलेल्या कचऱ्याचाही ढीग साचल्याचे पाहायला मिळाले. कचऱ्याच्या दुर्गंधी शेजारी संबंधित तरुण अगदी आरामात पहुडल्याचे पाहून अनेकांना नवल वाटले. अनेकांनी तो जिवंत आहे की मृत याचीही शहनिशा त्याच्या जवळ जाऊन करण्याचा प्रयत्न केला. जवळ जाऊन पाहिल्यानंतर त्याचा श्र्वासोच्छ्वास चालू असल्याचे प्रस्तुत प्रतिनिधिनेही जाणून घेतले. हे दृश्य पाहून अनेकांनी तरुणांमध्ये सध्या वाढत असलेल्या सर्वच प्रकारच्या व्यसनांबद्दल तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. वाढत्या उन्हामुळे उष्माघाताने मृत्यू पावणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. लातूर जिल्ह्यात रविवारीच औसा तालुक्यातील एका तरुणाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. नजीकच्या काळात ती संख्या वाढता कामा नायटे. या भावनेने प्रस्तुत मद्यधुंद तरुणांबद्दल तात्काळ लातूरच्या गांधी चौक पोलीस ठाण्यात जाऊन संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांना या प्रकाराची माहितीही दिली. असे प्रकार रोखण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनीच आता पुढे येण्याची आवश्यकता असल्याचे बोलले जात आहे.

## महापुरुषांच्या अवमानातून दंगलीचे षडयंत्र : प्रा.भिंगे

**तभा वृत्तसेवा**




**लातूर दि.२७ एप्रिल :** शिव-अहिल्यादेवी-फुले-शाहू-आंबेडकर-अण्णाभाऊ साठेंच्या या भूमीत विघटनवादी शक्ती वाढत आहेत. महापुरुषांचा अवमान करून दंगली घडविण्याचे षडयंत्र सुरू आहे. मुख्यमंत्री भांडणे लावण्यास प्रवृत्त करीत आहेत, असा आरोप काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे यांनी रविवारी (दि.२६) पत्रकार परिषदेत केला.

पुणे येथील महात्मा फुले यांच्या समता भूमीला वंदन करून २० एप्रिलपासून काँग्रेस ओबीसी विभागाच्यावतीने राज्यात समता यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी ही यात्रा लातुरात पोहचली. यात्रेचे स्वागत करण्यात आले. यानंतर काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

प्रा. भिंगे म्हणाले, समाज, देशाचा विचार करणारी माणसं आता राजकारणातून जवळपास परागंदा झाली आहेत. म्हणून आज यापूर्वी कधीच लागला नव्हता, तो एक भस्मारोग महाराष्ट्राच्या राजकारणाला लागला आहे. त्याचे कारण आजची सत्ता आहे. कोणत्याही परिस्थितीत भावात भाऊ, गावात गाव, पक्षात पक्ष न ठेवता सातत्याने आम्हीच सत्तेत राहू, ही मानसिकता बनली आहे. सगळ्यात भीषण वाक्य म्हणजे, 'मी पुन्हा येईन' हे आहे. त्यांच्याएवढे त्वेषेने पछाडलेले राजकारणी दुसरे नाहीत. तीन वेळेला सत्ता येते, तिन्ही वेळेला सांगायचे की, आमचा डीएनए ओबीसीचा असल्याचे सांगितले जाते, ओबीसी-मराठा वाद लावण्याचे काम सुरू आहे, ते म्हणाले.

अहिल्यादेवींना धर्म रक्षक म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूला अहिल्यादेवींनी बांधलेला १७९१ मधला काशीचा मनकर्णिका घाट बुलडोजरने पाडायचा, हे दुटप्पी धोरण सरकार करीत आहे. त्याचा नुसता निषेध करणार नाही तर तो समाजापुढे आम्ही मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत, असे ते म्हणाले.

पत्रकार परिषदेस काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, नगरसेवक किरण जाधव, ओबीसी जिल्हाध्यक्ष प्रा. एकनाथ पाटील, महापालिकेतील गटनेते विजयकुमार साबदे, व्यंकटेश पुरी, प्रवीण सूर्यवंशी, प्रवीण कांबळे, शरद देशमुख उपस्थित होते.

## समाज कल्याण विभागांतर्गत निधी प्रमाणपत्रांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने दि २३ एप्रील २०२६ वार गुरुवार रोजी खरेदी-विक्री संघ मुरुड येथे निधी व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हनुमंत (बापू) नागटिळक उपसरपंच ग्रामपंचायत , मुरुड हे होते.

जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग, लातूर यांच्यावतीने दिव्यांग निधी अंतर्गत दिव्यांगांना शेळी गट, पिठाची गिरणी, चटणी कांडप व इतर साहित्य तसेच २० टक्के शेष फंडातून मागासवर्गीय महिला व पुरुष बचत गटासाठी रोजगार करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जात असतो. सदरील योजना लकी ड्रॉ पद्धतीने लाभार्थीची निवड केली जाते. मुरुड येथील शेळी गटासाठी ४ लाभार्थ्यांची मिरची कांडप साठी २ लाभार्थीची व पिठाच्या गिरणीसाठी १ लाभार्थीची निवड झाली तसेच ३ महिला बचत गट व २ पुरुष बचत गट यांची निवड झाली होती. त्या माध्यमातून ३ लाख ५० हजार रुपयांचा निधी मुरुड जिल्हा परिषद गटास मिळाला आहे.

या कार्यक्रमात उत्तमराव माने (सभापती समाज कल्याण जिल्हा परिषद, लातूर) यांच्या हस्ते सदरील लाभार्थ्यांना प्रमाणपत्र व निधी वाटप करण्यात आला. श्रीपती माळी (उपसरपंच ग्रामपंचायत, मुरुड) पंकज गायकवाड (पंचायत समिती सदस्य, लातूर) संतोष शिंदे (ज्येष्ठ नेते) भक्तावर बागवान (ज्येष्ठ नेते) आकाश कणसे (उपसरपंच ग्रामपंचायत मुरुड) गौतम (बप्पा) लांडगे सतीश अंधारे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतीश मिसाळ, मोहित डोळसे, बाळू गाडे, मयूर काळुंखे, मयूर सुरवसे, राहूल कांबळे, रवी उबाळे, अमर सुरवसे, सतीश हिंगे, प्रणव गाडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन सौ जयश्री तवले (जिल्हा परिषद सदस्या, मुरुड गट- लातूर) लक्ष्मीकांत तवले (अध्यक्ष कै. पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार प्रतिष्ठान मुरुड) यांनी केले होते.

## दिशा प्रतिष्ठानचा सहावा वर्धापन दिनानिमित्त मोफत शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि.२७ एप्रिल :** मानवतेच्या सेवेचा वसा जपत शिक्षण व आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या दिशा प्रतिष्ठानच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य मोफत शस्त्रक्रिया शिबिर उत्साहात व यशस्वीरित्या पार पडले.

दि. २१ मार्च ते २१ एप्रिल या कालावधीत आयोजित या शिबिरासाठी दररोज सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत क्रीडा संकुल, लातूर येथील दिशा प्रतिष्ठानच्या मुख्य कार्यालयात नोंदणी करण्यात आली होती. शिबिरात अँजिओप्लास्टी, कॅन्सर, प्रोस्टेट ग्रंथी, मुतखडा, मणक्याचे आजार तसेच ब्रेन ट्यूमर यांसारख्या गंभीर आजारांवर १००% मोफत शस्त्रक्रिया (औषधांसह) करण्यात आल्या. अँजिओग्राफीसाठी मात्र ५००० शुल्क आकारण्यात आले.

तसेच हाडे, डोळे, कान-नाक-घसा, जनरल व स्त्रीरोग शस्त्रक्रियांवर ५०% सवलत (औषधाविना) देण्यात आली. शस्त्रक्रिया सह्याद्री हॉस्पिटल, पोद्दार हॉस्पिटल, काळे हॉस्पिटल, गोरे हॉस्पिटल, सारडा हॉस्पिटल, सिग्मा आय हॉस्पिटल व हार्मोनी हॉस्पिटल येथे करण्यात आल्या. याशिवाय रक्त तपासणी, सीटी स्कॅन व एमआरआय तपासण्या ५०% सवलतीत उपलब्ध करून देण्यात आल्या. या उपक्रमातून एकूण ६१ रुग्णांच्या यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून रुग्णांनी दिशा प्रतिष्ठानप्रती कृतज्ञता व्यक्त करत आभार मानले.

## पशु पालकांना उद्योजकतेकडे वळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक : जिल्हाधिकारी बास्टेवाड

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि.२७ एप्रिल :** पशुपालकांना वेळेवर उपचार, रोगप्रतिबंधक लसीकरण आणि आधुनिक पशुपालन व्यवस्थापन यावर भर देण्याची गरज आहे. पशुपालकांना उद्योजकतेकडे वळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच श्र्वानांचे निर्बीजीकरण करून लातूर जिल्हा रेबीजमुक्त करण्याचे आवाहनही लातूरचे जिल्हाधिकारी तथा पशुवैद्यक डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

जागतिक पशुवैद्यक दिनानिमित्त लातूर येथे पशुसंवर्धन विभाग, लातूर व एमएसडी यांच्या संयुक्त विद्यमाने 'पशुवैद्यक अन्नसुरक्षा व सार्वजनिक आरोग्याचे रक्षक' या विषयावर जिल्हास्तरीय तांत्रिक परिसंवाद उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पशुवैद्यकांचा विशेष सन्मान कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पशुवैद्यकांचा विशेष सन्मान करण्यात आला. यात डॉ. श्रीधर शिंदे, डॉ. विजय जाधव, डॉ. भास्कर बोरगावकर, डॉ. नेताजी शिंगटे, डॉ. राम हुडगे, डॉ. वसंत गुळवे, डॉ. सूर्यकांत नागरगोजे, डॉ. मधुकर बोरुळे, डॉ. धीरज मानकरी व डॉ. आला. महादेव जगताप यांचा गौरव करण्यात जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड बोलत होते. यावेळी प्रादेशिक सहआयुक्त डॉ. नाना सोनवणे, कर्नाटक पशुवैद्यकीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. शिवशंकर उस्तूरगे, कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे, देवणी गोवंश संघटनेचे डॉ. भास्कर बोरगावकर,

ज्येष्ठ पशुवैद्यकीय शाखज्ञ डॉ. अनिल भिकाने, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉ. भिकाने म्हणाले की, देशाच्या अर्थव्यवस्थेत पशुवैद्यकांचे योगदान अत्यंत मोलाचे असून अन्नसुरक्षा, अन्न सुरक्षितता व सार्वजनिक आरोग्याचे खरे रक्षक म्हणून पशुवैद्यकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

यावेळी प्रा. डॉ. ठोंबरे म्हणाले, पशुवैदक, शेतकरी, पशुपालक व शाखर यांनी पशुधनाच्या पैदास, आहार, व्यवस्थापन व आरोग्य या बाबत भविष्यवेध घेउन गुणात्मक व संख्यात्मक पशुधन वृद्धीतुन पशुपालक आत्मनिर्भर होण्यासाठी संयुक्त प्रयत्न करावेत. तसेच डॉ. सोनवणे व डॉ. बोरगावकर यांनी समयोचित मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजकुमार पडिले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले. त्यांना डॉ. समीर सास्तुरकर यांनी सहकार्य केले. आभार प्रदर्शन डॉ. सुधाकर साळवे यांनी केले. कार्यक्रमास एमएसडीचे प्रक्षेत्र व्यवस्थापक कुणाल घुगांडे यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील १५० हून अधिक पशुवैद्यकीय अधिकारी, प्राध्यापक, खाजगी पशुवैद्यक, उद्योजक व पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डंख छोटा, धोका मोठा : डासांद्वारे पसरणाऱ्या आजारांविरुद्ध जनजागृती उपक्रम

## जागतिक हिवतापदिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि.२७ एप्रिल :** हिवताप दुरीकरणासाठी कटिबद्ध-आता हे शक्य आहे, आता हे केलेच पाहिजे' या घोषवाक्याखाली राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात जागतिक हिवताप दिन विविध आरोग्य संस्थांमध्ये साजरा करण्यात आला. हिवताप या डासांद्वारे पसरणाऱ्या आजाराविरुद्ध जनजागृती करणे व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. एस. व्ही. पवार म्हणाले की, हिवतापावर नियंत्रण मिळविण्यासाठी शासकीय यंत्रणेसोबतच लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास हिवतापाचा पूर्णतः पराभव शक्य आहे. हिवताप नियंत्रणाबाबत सकारात्मक चित्र दिसून येत असून मागील काही वर्षांत रुग्णसंख्येत लक्षणीय घट झाली आहे. सन २०२० मध्ये २, ९९,१८८ रक्तनमुने तपासून ७ रुग्ण आढळले होते. २०२१ मध्ये २, ६४,०२५ नमुन्यांत १ रुग्ण आढळला तर २०२२ व २०२३ मध्ये अनुक्रमे ३,७०,४२९ व ४,४०, २२८ नमुन्यांमध्ये एकही रुग्ण आढळला नाही. २०२४ व २०२५ मध्येही अत्यल्प किंवा शून्य रुग्ण नोंदवले गेले असून जिल्हा हिवतापमुक्तीकडे वाटचाल करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट झाले आहे.

हिवताप हा 'प्लाझ्मोडियम' परोपजीवी जंतूमुळे होणारा आजार असून तो ॲनॉफिलीस जातीच्या मादी डासांमार्फत पसरतो. थंडी वाजून ताप येणे, डोकेदुखी, उलट्या, घाम येणे ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. योग्य वेळी रक्ततपासणी करून निदान केल्यास उपचार शक्य आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये व जिल्हा रुग्णालयात तपासणी व औषधोपचार मोफत उपलब्ध आहेत.

यावेळी नागरिकांना वैयक्तिक व सामाजिक स्तरावर प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले. अंगभर कपडे घालणे, मच्छरदाणीचा वापर, डासप्रतिबंधक साधनांचा उपयोग करणे, तसेच घराभोवती पाणी साचू न देणे, गटारी स्वच्छ ठेवणे, पाण्याचे साठे नियमित रिकामे करणे आदी उपाय महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले.

उपजल्हि रुग्णालय, उदगीर येथे झालेल्या मुख्य कार्यक्रमाला सहसंचालक आरोग्य सेवा डॉ. प्रेमचंद कांबळे, सहाय्यक संचालक डॉ. बालाजी बरुरे, सहाय्यक संचालक डॉ. मोनिका पाटील, डॉ. देशपांडे, डॉ. राठोड, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संजय पवार तसेच बांधकाम व आरोग्य सभापती ज्ञानेश्र्वर बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन अखिल कुलकर्णी यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. संजय पवार यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## 'तरुण भारत कृतज्ञता गौरव पुरस्कार' सोहळा उत्साहात संपन्न...

# तरुण भारत आपल्या कुटुंबाचा घटक : प्रशांत माने

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

दैनिक 'तरुण भारत' हे केवळ एक वृत्तपत्र नसून वाचकांच्या कुटुंबाचा घटक आहे. आम्ही कधीही भडक, दिशाभूल करणाऱ्या किंवा सनसनाटी बातम्यांना स्थान देत नाही. वस्तुनिष्ठ, सत्य आणि सर्वसमावेशक बातम्या वाचकांपर्यंत पोहोचवणे ही आमची प्राथमिकता असून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देत पत्रकारिता करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे मत तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांनी व्यक्त केले.

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ एकलव्य विद्या संकूल येथे दैनिक तरुण भारत आयोजित 'कृतज्ञता गौरव पुरस्कार' सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, तसेच तरुण भारत परिवाराचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवरांना 'कृतज्ञता गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. शिक्षण, आरोग्य, सामाजिक कार्य, उद्योग, तसेच सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात आले. सत्कारमूर्तींच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या योगदानाची दखल घेण्यात आली.

यावेळी प्रशांत माने यांनी सर्व पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे अभिनंदन करताना सांगितले की, समाजाच्या उन्नतीसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणे ही आमची जबाबदारी आहे. त्यांच्या कार्यातून समाजाला प्रेरणा मिळते आणि नव्या पिढीला सकारात्मक दिशा मिळते.

संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त तसेच नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या विविध प्रेरणादायी उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर तरुण भारत परिवाराने धाराशिव जिल्हा आवृत्ती कार्यालयाच्या माध्यमातून हाती घेतलेले सामाजिक उपक्रम कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले.

भविष्यातही समाजोपयोगी, जनजागृतीपर आणि प्रेरणादायी उपक्रम सातत्याने राबवले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभावी पद्धतीने पार पडले. उपस्थित मान्यवरांनीही तरुण भारतच्या उपक्रमांचे कौतुक करत अशा कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते,




असे मत व्यक्त केले. 'तरुण भारत कृतज्ञता गौरव पुरस्कार' सोहळा हा समाजातील कार्यकर्त्यांच्या योगदानाची दखल घेणारा आणि प्रेरणा देणारा ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल सुर्यवंशी यांनी केले.

## : दै. तरूण भारत कृतज्ञता पुरस्कार प्राप्त सत्कारमूर्तींचा सत्कार व कार्यक्रमातील क्षणचित्रे :

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापनेच्या शताब्दी वर्षानिमित्त तसेच देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तपपूर्तीनिमित्त दै. तरूण भारत धाराशिव जिल्हा आवृत्ती कार्यालय व सोलापूर मुख्य कार्यालयाच्या वतीने संघ परिवारातील व इतर सामाजिक कार्यातील मान्यवरांचा कृतज्ञता गौरव पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील, समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, प्रकाशक दिलीप दुलंगे, मराठवाडा विभागीय आवृत्ती प्रमुख राजाराम मस्के यांच्या हस्ते खालील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.**



**सत्कार :** आ. राणादादा यांच्या हस्ते मुख्य संपादक प्रशांत माने यांचा सत्कार करण्यात आला.



**प्रतिमा पुजन :** उपस्थित विविध मान्यवरांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.



**विनोद गंगणे :** तुळजापूर लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून विकास यासाठी ते सातत्याने कार्यरत.



**महादेवराव गायकवाड :** सेवा प्रकल्प योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले.



**चंद्रकांत गडेकर :** सेवा प्रकल्प योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले.



**व्यंकटराव सिंदफळे :** सेंद्रिय शेती व्यवस्थापन कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.



**गणेश जळके :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.



**बाळासाहेब शामराज :** भाजपा संघटन कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.



**गणेश सदाफुले :** गो-पालन सेवा विशेष कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.



**अंबादास पोफळे :** दै. तरूण भारतचे ज्येष्ठ प्रतिनिधी म्हणून सन्मानित करण्यात आले.



**महेंद्र कावरे :** डॉ. हेडगेवार रक्तसंकलन सेवा कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.



**सौ. अश्विनी अनंत कोंडो :** भगवत गीता प्रसार सेवा कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.



**विशाल सुर्यवंशी :** राज्यस्तरीय आर्दश शिक्षक वक्ता म्हणून सन्मानित करण्यात आले.



**अनिल जाधव :** तुळजापूर तालुका संघचालक प्रमुख पाहुणे म्हणून सन्मानित केले.



**विठ्ठल म्हेत्रे :** मुख्याध्यापक एकलव्य विद्या संकुल प्रमुख पाहुणे म्हणून सन्मानित केले.



**गुलचंद व्यवहारे :** भाजपा प्रदेश सदस्य प्रमुख उपस्थिती म्हणून सन्मानित करण्यात आले.



**गणेश चादरे :** सामाजिक कार्यकर्ते प्रमुख उपस्थिती म्हणून सन्मानित करण्यात आले.



**बाबा घोंगते :** भाजपा युवा नेते प्रमुख उपस्थिती म्हणून सन्मानित करण्यात आले.



**गणेश पुजारी :** अध्यक्ष पुजारी नगर फाऊंडेशन अतिथी म्हणून सन्मानित करण्यात आले.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## कळंब तालुक्यात अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

कळंब तालुक्यातील एका गावात १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या प्रकरणी दोन तरुणांविरुद्ध कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित मुलगी दि.२४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ८ वाजता खाऊ आणण्यासाठी दुकानाकडे गेली होती.



यावेळी गावातील दोन तरुणांनी बोलण्याच्या बहाण्याने तिला एका गोडाऊनमध्ये नेले व तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे.

घटनेनंतर पीडितेने दि. २६ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### धनंजय सावंत यांचा आंद्रुड येथे सत्कार

**भूम, दि.२७ एप्रिल -**

नुतन जिल्हा परिषद सदस्य धनंजय सावंत यांचा कार्यकर्ते गाठी भेटी दौरा सुरु असून तालुक्यातील आंद्रुड येथे ग्रामपंचायत कार्यालय यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी जि.प.चे माजी सदस्य प्रा. ज्ञानेश्वर गिते, संभाजी नलावडे, निलेश चव्हाण, मयूर गिरी, उपसरपंच निवृत्ती तावरे, शिवाजी लिमकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### तुळजापूरात पार्किंगच्या समस्येवर उपायाची मागणी

**तुळजापूर, दि.२७ एप्रिल -**

तहसील कार्यालयाशेजारी महिला व बाल विकास विभागाच्या परिसरातील जुन्या सरकारी दवाखान्याची इमारत सध्या पडीक अवस्थेत असून ती जागा निष्क्रिय पडली आहे. तहसील कार्यालयात दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिक येत असल्याने परिसरात वाहनांची गर्दी वाढली आहे. पार्किंगची सुविधा नसल्याने वाहनधारक रस्त्यावरच गाड्या उभ्या करतात, त्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होत असून नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर पडीक इमारत पाडून त्या ठिकाणी प्रशस्त पार्किंगची व्यवस्था करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले असून नगरसेविका प्रगती लोंढे व इतर नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



### झेंडेवाडीत स्वयंशासन दिन साजरा

**भूम, दि.२७ एप्रिल -**

तालुक्यातील झेंडेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्वयंशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शाळेचा कारभार सांभाळत नेतृत्वगुणांचा अनुभव घेतला. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व इतर पदांची जबाबदारी विद्यार्थ्यांनी पार पाडली. शिक्षकांनी मार्गदर्शन करत उपक्रमाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमास ग्रामस्थ व मान्यवरांची उपस्थिती होती.



### श्रावणीला सागरी जलतरणात रौप्य

**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटना मान्यताप्राप्त ९ वी सरखेल कान्होजी आंग्रे खुली सागरी जलतरण स्पर्धा २०२६ मध्ये धाराशिव जिल्हा जलतरण संघटनेची जलतरणपटू श्रावणी पांडुरंग रणखांब हिने ५ किमी अंतर ५१ मिनिटे २१ सेकंदात पूर्ण करत द्वितीय क्रमांक मिळवून रौप्य पदक पटकावले. विजयदुर्ग येथील वाघोटन खाडीत पार पडलेल्या या स्पर्धेत समुद्रातील खडतर लाटा व प्रवाहांवर मात करत तिने ही उल्लेखनीय कामगिरी केली. राष्ट्रीय स्तरावरील निकषांनुसार तिचा वेळ दर्जेदार मानला जात आहे. यापूर्वीही तिने अंतरमहाविद्यालयीन जलतरण स्पर्धेत १०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये प्रथम व ५० मीटर फ्रीस्टाइलमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला होता. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापकवर्ग तसेच जिल्हा जलतरण संघटना व प्रशिक्षकांनी अभिनंदन केले आहे. तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील खुल्या सागरी जलतरण स्पर्धेत क्रमांक मिळवणारी ती पहिली विद्यार्थिनी ठरली आहे.



### गेट-टुगेदर उत्साहात संपन्न

**भूम, दि.२७ एप्रिल -**

येथील श्री गुरूदेव दत्त हायस्कूलच्या १९९८ सालच्या इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांचा २८ वर्षांनंतर गेट-टुगेदर कार्यक्रम उत्साहात पार पडला. बालपणीच्या आठवणींना उजाळा देत जुन्या मित्र-मैत्रिणींची भेट घेताना सर्वजण भावूक झाले. परगावाहून आलेल्या माजी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षक, उद्योजक व शासकीय सेवेत कार्यरत व्यक्तींचा समावेश होता. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोहन बागडे, शैलेश फलके, सचिन सोनटक्के, आलम शेखदार, दीपक बारबोले, रवी शिंदे, उमेश वीर, आनंदी शाळु, रूपाली बळ आदींनी परिश्रम घेतले. यावेळी कल्याणराव मोटे, ए.के. गायकवाड, एस.जी. गायकवाड, कमलाकर साबळे आदी उपस्थित होते.

## गटशेतीला चालना; महिला शेतकरी गटांसाठी विशेष पारितोषिकांची घोषणा...

# फार्मर कप २०२६ स्पर्धेची संधी; शेतकऱ्यांसाठी ५० लाखांचे बक्षीस!

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२७ एप्रिल -**

तालुक्यातील शेतकरी बंधू-भगिनींसाठी प्रगतीची मोठी संधी उपलब्ध झाली असून राज्य शासनाच्या पुढाकाराने पाणी फाऊंडेशन, कृषी विभाग व उमेद अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने फार्मर कप २०२६ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील ३५१ तालुक्यांमध्ये ही स्पर्धा राबविण्यात येणार असून राज्यस्तरावरील विजेत्या गटाला तब्बल ५० लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक देण्यात येणार आहे.

या स्पर्धेत राज्यस्तरावर द्वितीय क्रमांकासाठी ३० लाख तर तृतीय क्रमांकासाठी २० लाख रुपयांची पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. तसेच जिल्हास्तरावर अनुक्रमे ५ लाख, ३ लाख व २ लाख रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी किमान ११ शेतकऱ्यांचा गट आणि



एकत्रित किमान १५ एकर शेती असणे आवश्यक आहे.

महिला शेतकरी गटांसाठी प्रत्येकी १० लाख रुपयांची तीन विशेष बक्षिसे राखीव ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे महिला गटांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन गट विकास अधिकारी लक्ष्मण वाजे यांनी केले आहे. नाव नोंदणी व गट स्थापन करण्यासाठी उमेद अभियानाचे कर्मचारी अमोल कासार व विलास ढगे यांच्याशी संपर्क साधण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रशिक्षण घेणे आवश्यक असून माढा तालुक्यातील लोंढेवाडी येथे दि. २७ ते २९ एप्रिल दरम्यान तीन दिवसांचे निवासी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. प्रत्येक गटातून किमान एका सदस्याने हे प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक आहे.

या स्पर्धेचा मुख्य उद्देश गटशेतीच्या माध्यमातून उत्पादन व उत्पन्न वाढवणे, खर्चात बचत करणे तसेच शेतीमालाच्या विक्री व प्रक्रिया उद्योगांना चालना देणे हा आहे. महिला, पुरुष तसेच मिश्र गटांना सहभागाची संधी देण्यात आली असून शेतकऱ्यांनी एकत्र येऊन या स्पर्धेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पवनचक्की प्रोजेक्टमधून केबल चोरी; १४.७१ लाखांचा माल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

जे.एस. डब्ल्यू पवनचक्की वीज निर्मिती प्रकल्पाच्या झिरो पॉईंट परिसरातून तब्बल १४ लाख ७१ हजार रुपयांच्या केबल वायरची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.८ जानेवारी २०२६ ते दि.११ मार्च २०२६ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत नारंगवाडी शिवारातील नेमल क्रमांक २४२१३२१, २४२१३२६, २४२१३२७ व २४२१३२९ येथे ठेवण्यात आलेल्या चार नेसलमधील केबल वायर अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. चोरीस गेलेल्या मालाची किंमत सुमारे १४,७१,०२४ रुपये इतकी आहे.

या प्रकरणी फिर्यादी शाम शेळके यांनी दि. २६ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## आढाळा शाळेचा गणेश सावंत गुणवत्ता यादीत

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२७ एप्रिल -**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या एन.एम.एम.एस शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाला असून, कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आढाळा येथील विद्यार्थी गणेश सावंत याने गुणवत्ता यादीत स्थान मिळवत ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

आढाळा शाळेच्या इतिहासात प्रथमच एखादा विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकल्याने परिसरात आनंदाचे वातावरण आहे. गणेश सावंत याला दरवर्षी १२ हजार रुपये प्रमाणे पाच वर्षांत एकूण ६० हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. तसेच ज्ञानेश्वरी विकास धावडे, साक्षी अतुल शिंदे आणि संग्राम वायकर हे विद्यार्थी देखील एन.एम.एम.एस परीक्षेस पात्र ठरले आहेत.



या विद्यार्थ्यांना शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड तसेच महादेव हरीकिसन खराटे, ऋषीकुमार साबळे, शिवनंदा स्वामी, बलभीम राऊत, तुकाराम कराळे आणि स्वयंसेवक बापू हगारे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल केंद्रप्रमुख सोमनाथ चंदनशिव, मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा राजश्री वायसे, उपाध्यक्ष विकास आरकडे, सदस्य, सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच, पोलीस पाटील तसेच शिक्षणप्रेमी नागरिक व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## कळंबमध्ये ज्येष्ठ महिलेला मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

कळंब मार्केट यार्ड परिसरात घरासमोर बसल्याच्या कारणावरून ६५ वर्षीय महिलेला जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना घडली.

याप्रकरणी कुलदीप खुडू चोंदे (रा. कळंब) याच्याविरुद्ध कमलबाई राजा काळे (वय ६५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीने लाथाबुक्यांसह दगड व काठीने मारहाण करून जखमी केले तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

## गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक; सावंतांची संघटन बळकटीची गर्जना

**▸▸ पुण्यातील बैठकीनंतर धाराशिव जिल्ह्यात शिवसैनिकांत उत्साह... ▸▸ गावागावांत शाखा विस्ताराला वेग...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२७ एप्रिल -**

राज्याचे माजी आरोग्यमंत्री व परंडा मतदारसंघाचे आमदार तानाजीराव सावंत यांनी गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक अशी शिवगर्जना करत संघटन बळकटीसाठी नवी दिशा दिली आहे. या घोषणेनंतर धाराशिव जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून गावागावांत शाखा स्थापन करण्यासाठी हालचालींना वेग आला आहे.



जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये मिळालेल्या यशानंतर पुणे येथे आयोजित बैठकीत सावंत यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे कौतुक करत त्यांच्या कामगिरीची दखल घेतली. निवडणुकीतील यशामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक ही संकल्पना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने मोहीम राबविण्यात येत आहे.

शाखा विस्तारासोबतच नव्या कार्यकर्त्यांना जोडण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

पुण्यातील या बैठकीस भूम, परंडा व वाशी मतदारसंघातील पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रूईभरच्या जयप्रकाश विद्यालयात शिष्यवृत्तीधारकांचा सत्कार समारंभ



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, शिक्षणमहर्षी सुभाष दादा कोळगे होते. त्यांच्या हस्ते विद्यालयातील शिष्यवृत्तीधारक दोन विद्यार्थिनींचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत अक्षरा रणजित माने हिने १४८ गुण मिळवून धाराशिव जिल्ह्यात सहावा क्रमांक, तर भैरवी शरद जगताप हिने १२९ गुण मिळवून जिल्ह्यात ६० वा क्रमांक मिळविला आहे.

या दोन्ही विद्यार्थिनींना केंद्र शासनामार्फत दरवर्षी १२,००० रुपये प्रमाणे चार वर्षांत एकूण ४८,००० रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणारे एनएमएमएस विभाग प्रमुख विनय सारंग, काकासाहेब डोंगरे, विकास क्षीरसागर, कांबळे बी.डी., अमर कोळगे आणि अभिजित घोळवे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विनय सारंग यांनी मानले.

## धाराशिवमध्ये शिवभक्तांचा निषेध, कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी कथित अवमानास्पद वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ शहरातील शिवभक्त आक्रमक झाले. धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्यावर देशद्रोहासह कठोर गुन्हे दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात शिवरायांविषयी होणारा अवमान हा महाराष्ट्राच्या अस्मितेवर घाला असल्याचे नमूद करत अशा वक्तव्यांचा तीव्र निषेध करण्यात आला. तसेच भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कठोर धोरण राबवावे, अशी मागणी करण्यात आली.

या निषेध आंदोलनात शहरातील अनेक शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## शासकीय नोकरीचे आमिष; २० लाखांची फसवणूक

**▸▸ कामेगावातील ज्येष्ठ नागरिकासह एकास गंडा**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ एप्रिल -**

शासकीय नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून तब्बल २० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार कामेगाव (ता. जि. धाराशिव) येथे उघडकीस आला आहे. याप्रकरणी बेंबळी पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मोहन माधवराव कदम (रा. कामेगाव) व प्रशांत सुंदरराव कुलकर्णी, प्रविण सुंदरराव कुलकर्णी (दोघे रा. धाराशिव) यांनी फिर्यादी व्यंकट महादेव वाघमारे (वय ६४) यांना त्यांच्या मुलाला शासकीय नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले. या आमिषाला बळी पडून वाघमारे यांनी आरोपींना १२ लाख रुपये दिले.

तसेच, आरोपींनी गावातील समाधान गुळीक यांनाही शासकीय नोकरीचे आश्वासन देत त्यांच्याकडून ८ लाख रुपये उकळल्याचे समोर आले आहे. मात्र, दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न करता आरोपींनी दोघांचीही फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी व्यंकट वाघमारे यांनी दि. २६ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## गोसंरक्षणासाठी ठोस कायदे व ‘राष्ट्रमाता’ दर्जाची मागणी; ५ हजार नागरिकांच्या सह्यांसह निवेदन सादर

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ एप्रिल -**

‘गौ सम्मान आह्वान अभियान’ अंतर्गत सकल हिंदू समाजाच्या वतीने उमरगा तहसील कार्यालयात गोसंरक्षणासाठी महत्त्वपूर्ण निवेदन तहसीलदारांना सादर करण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून देशभरात गोसंरक्षणाबाबत व्यापक जनजागृती करून ठोस कायदे करण्याचा उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

सादर करण्यात आलेल्या निवेदनात देशात गोहत्या पूर्णपणे बंद करण्याची मागणी करण्यात आली असून, गायीला ‘राष्ट्रमाता’चा दर्जा द्यावा, गोसेवेसाठी स्वतंत्र केंद्रीय कायदा तयार करावा, तसेच गोसंरक्षणासाठी स्वतंत्र केंद्रीय मंत्रालय आणि गोचर बोर्ड स्थापन करावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

या निवेदनावर तब्बल ५,००० नागरिकांच्या सह्या असून विविध क्षेत्रातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ‘गौ सम्मान आह्वान अभियान’ अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमाला उमरग्यात मोठा प्रतिसाद मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले. गौमातेचे संरक्षण अधिक प्रभावीपणे व्हावे आणि मांडलेल्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन त्या वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवाव्यात, अशी विनंती तहसीलदारांना करण्यात आली. यावेळी नितेश राखेलकर, गणेश कटके, नितिन नांगरे, प्रदीप मुळे, अनुज सगर, सोमनाथ जाधव, अमर शिंदे, काशिनाथ जाधव, ओम



पाटील, समर्थ दांडगे, श्रेयश कार्लेकर, म्हणतेश स्वामी, अजय माने आदी उपस्थित होते.